# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः25.07.2024** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

1. केंद्रीय अर्थसंकल्पात निधी वाटप करताना काही राज्यांसोबत भेदभाव केल्याचा आरोप अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी फेटाळला.
2. 2 लाख 62 हजार कोटी रुपयांच्या रेल्वे अर्थसंकल्पापैकी 1 लाख कोटींहून अधिक रक्कम रेल्वे सुरक्षेसाठी राखीव
3. साहित्यिक, पर्यावरणवादी चळवळीतील लढवय्ये कार्यकर्ते फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचं निधन
4. महिलांच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत श्रीलंका-पाकिस्तान आणि भारत-बांग्लादेश लढत आणि
5. गुजरात, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात जोरदार पावसाचा हवामान विभागाचा अंदाज.

**संसद-बजेट-चर्चा**

2024-25 च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये काल चर्चा झाली. जम्मू आणि काश्मीर या केंद्रशासित प्रदेशाच्या 24-25 च्या अर्थसंकल्पावरही लोकसभा आणि राज्यसभेत चर्चा करण्यात आली. राज्यसभेत चर्चेला सुरुवात करताना काँग्रेसचे खासदार पी चिदंबरम यांनी बेरोजगारी आणि महागाईचे मुद्दे उपस्थित करत बेरोजगारी ही सर्वात मोठी समस्या असल्याचं सांगितलं. उत्पादनावर आधारित प्रोत्साहन योजनेमुळे देशात पुरेशा नोकऱ्या निर्माण झाल्या नाहीत असं ते म्हणाले. दरम्यान, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काही राज्यांबाबत केंद्रीय अर्थसंकल्पात भेदभाव केल्याचा आरोप फेटाळून लावला आहे. विरोधी पक्षांचं सरकार असलेल्या राज्यांना अर्थसंकल्पात काहीही दिलेलं नाही, असा चुकीचा समज जनतेत पसरवण्याचं काम काँग्रेसच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्ष जाणीवपूर्वक करत असल्याचा आरोप त्यांनी केला. काल राज्यसभेत शून्य प्रहरात विरोधकांच्या आरोपांना उत्तर देताना त्या बोलत होत्या. लोकसभेत चर्चेला सुरुवात करताना काँग्रेसच्या कुमारी सेलजा यांनी देशात दिवसेंदिवस बेरोजगारी वाढत असल्यामचा मुद्दा उपस्थित केला. चर्चेत भाग घेताना भाजपचे बिप्लब कुमार देब यांनी नरेंद्र मोदी सरकारने आर्थिक व्यवस्था पारदर्शक केली असून आर्थिक सर्वेक्षणानुसार 24-25 या वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन साडेसहा ते

7 टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज असल्याचं सांगितलं. केंद्रीय अर्थसंकल्पात भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार उत्तर प्रदेशकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप समाजवादी पक्षाचे वीरेंद्र सिंह यांनी केला. टीडीपीचे श्रीबरत मथुकुमिली यांनी केंद्रीय अर्थसंकल्प दूरदर्शी असून हे विकसित भारतासाठी सरकारच्या असलेल्या अटल वचनबद्धतेचं उदाहरण असल्याचं म्हटलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे यांनी जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुका घेण्याची सरकारला विनंती केली. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**अश्विनी वैष्णव**

रेल्वे अर्थसंकल्पातील मोठा भाग रेल्वेची सुरक्षा वाढविण्यासाठी ठेवण्यात आल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. 2 लाख 62 हजार कोटी रुपयांच्या एकंदर अर्थसंकल्पापैकी 1  लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम रेल्वे सुरक्षा-संबंधित उपायांसाठी राखून ठेवण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**बिहार-परीक्षा**

बिहार राज्य विधानसभेनं प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणं, परीक्षांमधील गैरप्रकार आणि सरकारी स्पर्धा परीक्षांमधील अनियमितता रोखण्यासाठी काल एक कठोर विधेयक मंजूर केलं. बिहार सार्वजनिक परीक्षा – गैरमार्ग प्रतिबंध विधेयक 2024 नुसार आता गंभीर प्रकरणांमध्ये 3 वर्षांवरून 10 वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि 1 कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. जलसंपदा मंत्री विजय कुमार चौधरी यांनी हे विधेयक सादर केलं.

**करगिल-विजय-दिवस**

करगिल विजय दिवसाच्या 25 व्या वर्धापन दिनानिमित्त, करगिलमध्ये उद्या 26 जुलै रोजी युनिफॉर्म फोर्स मुख्यालयानं आयोजित केलेल्या ‘महिला मोटरसायकल फेरी’ सह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. या फेरीमध्ये भारतीय सैनिकांच्या अदम्य भावनेला आणि नारी शक्तीला मानवंदना देण्यासाठी  25 निष्णात महिला मोटरसायकल चालक सहभागी होणार आहेत. यामध्ये देशभरातील लष्करी कर्मचाऱ्यांच्या पत्नी, लष्करी सेवेतील महिला अधिकारी आणि अन्य पदाधिकारी महिला सहभागी होतील.

**अग्नीवीर-महिला**

भारतीय हवाई दलातील पहिला - महिला कवायत संघ तयार करण्यासाठी 29 अग्निवीरवायू महिला - एकत्र येणार आहेत. हा महिला संघ 26 जुलै रोजी करगिल विजय दिवसानिमित्त इंडिया गेट संकुलात

कवायत करणार आहे. वायुसेनेच्या बँडसह होणाऱ्या, शक्ती आणि एकतेचं प्रतीक असलेल्या या अनोख्या कार्यक्रमात सहभागी  होण्यासाठी; भारतीय वायुसेनेनं सर्व नागरिकांना आमंत्रित केलं आहे.

**ब्रह्मपुत्र**

भारतीय नौदलाच्या नौकेला INS ब्रह्मपुत्रेला लागलेल्या आगीच्या घटनेनंतर बेपत्ता झालेल्या अग्रगण्य नौ-सैनिकाचा मृतदेह काल सापडला. नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी नौ-सैनिकाच्या कुटुंबीयांप्रती तीव्र संवेदना व्यक्त केल्या आहेत. आयएनएस ब्रह्मपुत्रा संबंधी मुंबईतल्या नौदलाच्या गोदीत घडलेल्या घटनेनंतर, ॲडमिरल त्रिपाठी यांनी काल मुंबईत जाऊन अपघाताला कारणीभूत असलेल्या घटनाक्रमाचा आणि बेपत्ता खलाशाचा शोध घेण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला. तसंच जहाज लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी सर्व संबंधितांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**बांगलादेश**

बांगलादेशमध्ये, काल राष्ट्रीय सुट्टी संपल्यामुळे आणि सरकारनं गेल्या शुक्रवारी रात्रीपासून हिंसाचार नियंत्रित करण्यासाठी लागू केलेली  संचारबंदी  सात तासांसाठी सकाळी 10 ते संध्याकाळी 5 पर्यंत शिथिल केल्यानंतर; लोकांचं जीवन पूर्वपदावर येऊलागलं आहे. कपड्यांचे कारखाने, बँका आणि स्टॉक एक्स्चेंजसह सर्व सार्वजनिक आणि खासगी कार्यालयं  पुन्हा सुरू झाली असून कर्मचारी काल सकाळपासून आपापल्या कामावर उत्स्फूर्तपणे रुजू झाले आहेत. सोमवारी पंतप्रधान शेख हसीना यांच्यासमवेत देशातील व्यावसायिक नेत्यांच्या बैठकीनंतर ढाका आणि जवळपासच्या जिल्ह्यांमध्ये असलेले बहुतांश सर्व कपड्यांचे कारखाने पुन्हा सुरू करण्यात आले आहेत.

**सेबी-इंट्रा-डे**

2022-23 या आर्थिक वर्षात इक्विटी कॅश विभागातील वैयक्तिक इंट्रा-डे ट्रेडर्सपैकी 70 टक्क्यांहून अधिक ट्रेडर्सचं नुकसान झालं असल्याचं SEBI ने केलेल्या एका अभ्यासात आढळून आलं आहे. एकाच दिवसात समभागांची खरेदी आणि विक्री करणे याला इंट्रा-डे ट्रेडींग म्हणतात. आर्थिक वर्ष 2018-19 च्या तुलनेत 2022-23 या आर्थिक वर्षात इक्विटी कॅश विभागामध्ये इंट्रा-डे ट्रेडिंगमध्ये भाग घेणाऱ्या व्यक्तींच्या संख्येत 300 टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याचंही या अभ्यासात नमूद करण्यात आलं आहे.

**दिब्रिटो**

साहित्यिक, पर्यावरणवादी चळवळीतील लढवय्ये कार्यकर्ते फादर फ्रान्सिस दिब्रिटो  यांच आज पहाटे दीर्घ आजारानं महाराष्ट्रात वसई इथं राहत्या घरी निधन झालं. ते  82 वर्षांचे होते.  फादर फ्रान्सिस

दिब्रिटो हे  धाराशीव इथल्या 93 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. हरित वसई संरक्षण समिती'च्या माध्यमातून फ्रान्सिस दिब्रिटो यांनी पर्यावरण संरक्षण, जतन आणि संवर्धनाची मोठी चळवळ उभी केली होती.
संघर्षयात्रा ख्रिस्तभूमीची हे पुस्तक लिहिण्यासाठी दिब्रिटो यांनी बराच काळ इस्रायलमध्ये राहून संशोधन केलं होतं.

**क्रिकेट-आशिया करंडक**

महिला आशिया चषक क्रिकेटमध्ये, यजमान श्रीलंकेनं दांबुला इथं काल आपल्या अंतिम गट सामन्यात थायलंडवर दहा गडी राखून दणदणीत विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना थायलंडला श्रीलंकेच्या गोलंदाजांनी निर्धारित 20 षटकांत सात गडी बाद 93 धावांवर रोखले. श्रीलंकेनं बाराव्या षटकात विजयाचं लक्ष्य गाठलं. श्रीलंका आता उद्या दुसऱ्या उपांत्य फेरीत पाकिस्तानशी भिडणार आहे, त्याच दिवशी भारत आणि बांगलादेश यांच्यात पहिला उपांत्य सामना होणार आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने  पुढील दोन दिवस गुजरात, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात अतिवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे. त्यानंतर पुढील काही दिवस या भागात मुसळधार ते अति मुसळधार पाऊस सुरूच  राहील, असं हवामान खात्यानं म्हटलं आहे. देशाच्या मध्य भागात पुढील दोन दिवस अतिवृष्टी आणि त्यानंतरच्या तीन दिवसांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. गुजरात प्रदेशात काल 40 सेमी पेक्षा जास्त पाऊस पडला.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.